हितगुज

# सेंद्रिय शेतीसाठी प्रमाणीकरण




आशुतोष चिंचोळकर
(मो.नं. ९१४६९६६२२२)
कृषिमित्र, यवतमाळ





> सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण करण्यासाठी तसेच सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी सेंद्रिय प्रक्षेत्रावर पुरेशा नोंदी ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये प्रक्षेत्रावरील सर्व व्यवहार आणि कृती यांचा पुरेसा खुलासा असावा. मागील कमीतकमी पाच वर्षांच्या नोंदी उपलब्ध असाव्यात. यामध्ये प्रामुख्याने जमीन धारणा क्षेत्र, पीक आणि त्यांची उत्पादन पध्दती, उत्पादनांची तसेच निविष्ठांची साठवणूक, प्रक्रिया पध्दती, पॅकेजिंग यांच्या नोंदी असणे आवश्यक आहे.

सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण ही सेंद्रिय शेतमालाच्या उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंतच्या विश्वसनीय साखळीला जोडणारी कडी आहे, असे म्हटले तरी ते वावगे ठरू नये. गरज आहे ती फक्त ही प्रमाणीकरण पध्दत समजून घेण्याची. सेंद्रिय शेतीत पिकवला जाणारा शेतमाल हा सेंद्रिय पध्दतीनेच या पध्दतीची एकात्मता (सेंद्रिय बियाणे, सेंद्रिय खते, जैविक कीटकनाशके यांचा वापर करुनच केलेली शेती) भंग न करता पिकवला जातो. या साऱ्या प्रक्रियेचे खात्रीशीर व कायदेशीर प्रमाणपत्र म्हणजेच सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण होय.

सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण हे कुठलाही सेंद्रिय शेतमाल किंवा प्रक्रियायुक्त माल निर्यात करण्यासाठी अत्यंत आवश्यक असे विश्वसनीय माध्यम आहे. सेंद्रिय प्रमाणीकरणाची खऱ्या अर्थाने सुरुवात १९४७-४८ या दरम्यान इंग्लंड देशात झाली. त्या सुमारासच सेंद्रिय शेतीच्या उत्पादनांचे स्वतंत्ररित्या विपणन (मार्केटिंग) करण्यास सुरुवात झाली. सर्वप्रथम सेंद्रिय शेतीची तंत्रशुध्द मानके 'आयफॉम' या संस्थेने निर्माण केली आणि सेंद्रिय शेतीच्या तंत्रशुध्द प्रक्रियेला सुरुवात जर्मनी या देशात झाली. सन १९७२ मध्ये आयफॉम (IFOAM - International Federation of Organic Agriculture Movement ) नावाची संस्था सर्वप्रथम सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी पुढे सरसावली.

**प्रमाणीकरण कशाचे करावे ?**

सेंद्रिय शेती पध्दतीमध्ये प्रत्येक उत्पादन पध्दती आणि कृती किंवा त्याचा भाग त्यापासून तयार होणारे पीक, पशुधन आणि त्यांची उत्पादने व इतरही उत्पादने यांना '१०० टक्के सेंद्रिय किंवा पदार्थांपासून निर्मित' असे लेबल लावले जाते. त्यांची विक्री करण्यापूर्वी या सर्वांचे प्रमाणीकरण करणे आवश्यक असते. फक्त शेती उत्पादनाचे प्रमाणीकरण करता येत नाही तर त्या संपूर्ण उत्पादन पध्दतीचेच प्रमाणीकरण करावे लागते. यासाठी ही संपूर्ण उत्पादन पध्दत योग्य त्या मानकांप्रमाणे नियम व अटींचे पालन करणारी असावी लागते.

**प्रमाणीकरणाचे प्रकार :** आज जागतिक बाजारपेठेत प्रत्येक देशानुसार प्रमाणीकरणाचे निकष वेगवेगळे आहेत. भारतामध्ये सेंद्रिय शेती प्रमाणीकरणाचा अधिकार 'अपेडा' या केंद्र सरकारच्या संस्थेकडे आहे. आपल्या देशात सेंद्रिय उत्पादन कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून 'राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन मानके' या नावाने सेंद्रिय शेती व उत्पादनांना प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र भारतापुरतेच ग्राह्य धरले जाते. जर आपणास परदेशात माल पाठवायचा असेल तर संबंधित देशांच्या निकषांनुसार आपल्या उत्पादनांचे प्रमाणीकरण करून घेणे गरजेचे आहे. 'राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन मानके' या प्रमाणपत्राचा फायदा नवीन प्रमाणीकरणासाठी होतो. हे प्रमाणीकरण केल्यावर प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थेचे चिन्ह तसेच अपेडाचेही चिन्ह उत्पादकांना मिळते. त्यामुळे बाजारपेठेत सेंद्रिय मालाच्या विक्रीला अडचण येत नाही.



**सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक नोंदी**

सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण करण्यासाठी तसेच सर्व

कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी सेंद्रिय प्रक्षेत्रावर पुरेशा नोंदी ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये प्रक्षेत्रावरील सर्व व्यवहार आणि कृती यांचा पुरेसा खुलासा असावा. मागील कमीतकमी पाच वर्षांच्या नोंदी उपलब्ध असाव्यात. यामध्ये प्रामुख्याने जमीन धारणा क्षेत्र, पीक आणि त्यांची उत्पादन पध्दती, उत्पादनांची तसेच निविष्ठांची साठवणूक, प्रक्रिया पध्दती, पॅकेजिंग यांच्या नोंदी असणे आवश्यक आहे.

सेंद्रिय पध्दतीमध्ये रुपांतरित शेती करण्यापूर्वीची रासायनिक निविष्ठा वापरल्याच्या दिनांकाची नोंद ठेवावी. प्रक्षेत्रावर वापरण्यात येणाऱ्या निविष्ठा, त्यांचा स्त्रोत, स्थिती आणि प्रत याविषयी नोंदी ठेवाव्यात. प्रक्षेत्रावर उत्पादित तसेच बाहेरून आणलेले साहित्य- उदा. खते, औषधे, वनस्पती, बियाणे इत्यादी. या साऱ्याचा स्त्रोत, प्रत तसेच पीक लागवड करतेवेळी केलेली प्रक्रिया यांच्या नोंदी खालीलप्रमाणे ठेवाव्यात.

१. प्रक्षेत्रावरील पीक आराखडा, पिकाचा इतिहास.

२. खते, औषधे वापरल्याची तारीख, क्षेत्र इत्यादी.

३. प्राण्यांची वाहतूक, बाहेरून आणलेले, विकलेले, वय, ओळख, इतिहास आणि रूपांतर काळ इत्यादी.

४. बाहेरुन आणलेले जनावरांचे खाद्य, त्यांचा स्त्रोत, स्थिती, घटक इत्यादी प्रत्येक प्रकारच्या जनावरासाठी.

५. जनावरांची खरेदीची तारीख, ओळख, संख्या, पशुवैद्यकीय उपचार, त्यांची तारीख, दिलेली औषधे, सेंद्रिय शेतीतून बाहेर काढण्याचा काळ.

६. दररोज विक्री केलेला माल.

**सेंद्रिय शेतीशी निगडित संस्था**

**भारतातील संस्था :** १. ॲग्रिकल्चर ॲन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्ट्स एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (APEDA) तिसरा मजला, एनसीयूआय, भवन ३, सिरी इंटरनॅशनल एरिया, ऑगस्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली.

२. असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ऑरगॅनिक फार्मिंग (APOD), यू.ए.एस. ॲल्युम्नी असोसिएशन बिल्डिंग, बेल्लारी रोड, हेब्बाल, बेंगलोर- ५६००२४ (कर्नाटक), संकेतस्थळ : apofvsnl.net

३. स्पाईस बोर्ड ऑफ इंडिया, संकेत स्थळ : http : www.indianspices. com भारतातील संस्था : संकेत स्थळ : www.apeda.com/ www.apeda.gov.in .

४. कॉफी बोर्ड – संकेत स्थळ : www.indiacoffee.org

५. टी बोर्ड – संकेत स्थळ : www. teaboard.gov.in

६. नॅशनल सेंटर फॉर ऑरगॅनिक फार्मिंग, गाझियाबाद. संकेतस्थळ : http : www.dacnet.net.in/ ncaf

७. राष्ट्रीय सेंद्रिय शेती केंद्र, सीजीओ कॉम्प्लेक्स, कमला नेहरु नगर, गाझियाबाद, उत्तर प्रदेश.

**महाराष्ट्रातील प्रमाणीकरण यंत्रणा :** महाराष्ट्रातील खालील संस्थांचा अधिकृत प्रमाणीकरण संस्थांमध्ये



समावेश आहे.

१. इकोसर्ट – इंडिया प्रा.लि. सेक्टर- ३ , हिंदुस्थान आवास लि. वाल्मि, वाळूज रोड, नक्षत्रवाडी, औरंगाबाद, इमेल- indiaecocert.in

२. नॅचरल ऑरगॅनिक सर्टिफिकेशन एजन्सी (नोका), रो हाऊस (पाटी, वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड, पुणे)

३. बी.व्ही. सर्टिफिकेशन (इंडिया) प्रा.लि., मारवा सेंटर, ६ वा मजला, कृष्णलाल मारवा मार्ग, साकी-विहार रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई.

४. कंट्रोल युनियन सर्टिफिकेशन, पवने, एमआयडीसी, नवी मुंबई.

५. टीयूव्ही इंडिया प्रा.लि, राहेजा प्लाझा- १, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई.